International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.7 No.3 Jan –Feb 2020

# भारतीय महिलांचे हक्क आणि अधिकार

डॉ. आकाश शेषराव बांगर
संशोधक विद्यार्थी
आदर्श महाविद्यालय, हिंगोली

**सारांश (Abstract)**

भारतीय राज्यघटना ही देशाचा मूलभूत कायदा असून ती 26 जानेवारी 1950 रोजी अस्तित्वात आली त्यानुसार भारतीय राज्यघटना ही देशाच्या मूलभूत कायदा असून लिंगाच्या आधारावर कुठल्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही घटनेने प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठेचे जीवन जगण्याची हमी देते. भारतीय राज्यघटनेचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ती जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना आहे. महिलांना मानव म्हणून त्यांचे अधिकार आणि स्थान मिळवून देण्याच्या अशा अत्यंत महत्त्वाच्या आणि विशेष तरतुदी भारतीय राज्यघटनेमध्ये समाविष्ट केलेल्या आहेत.

भारत हा एक समृद्ध संस्कारी आणि परंपरा साठी ओळखला जातो. भारतीय समाजात महिलांवर होणाऱ्या अन्यायाच्या अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत विषमता ही जात, धर्म, लिंग या तीन घटकावर आधारित आहे. सुरुवातीपासूनच पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान मिळाले आहे स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तू आहे अशी अशी प्रतिगामी पारंपारिक पुरुष प्रधान मानसिकता आहे. स्त्रियांना सत्ता, संपत्ती, शिक्षण अशा प्रकारचे सारेच "हक्क, अधिकार नाकारण्यात आले होते. स्त्रियांवर धार्मिक कायद्याचा आधार घेऊन अधिकच बंधने लादली गेली होती त्यात सती प्रथा. हंडा प्रथा, बालविवाह यासारखे अनेक अन्यायकारक चालीरीतीने स्त्रियांचे आयुष्य बळी पडले ही बंधने ब्रिटिश आगमनापर्यंत चालूच होती. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले या दांपत्यांनी समाज सुधारकांची भूमिका घेतली आणि ते स्त्रियांसाठी शिक्षण असो की, स्त्री पुरुष समानता या तत्त्वाचा पुरस्कार घेऊन ध्यास संविधानिक अधिकार प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना आणि त्यानंतर हिंदू कोड या माध्यमातून केला. त्यातूनच महिलांना संविधानिक हक्क जाणवू लागले आणि आपल्या अधिकाराबद्दल आवाज उठवण्यासाठी समोर येऊ लागले.

**संज्ञा (Keyword) :** राज्यघटना, महिला, अधिकार, हक्क, स्त्री शिक्षण, संपत्ती, समानता इ.

## उदेश

१. भारतीय महिलांना संविधानाने दिलेले हक्क समजून घेणे.

२. महिला आपल्या हक्काबाबत जागरूक आहेत का नाही ते अभ्यासणे.

३. महिलांच्या हक्काबद्दल जाणून घेणे

## गृहितके

१. व्यक्तीच्या विकासामध्ये मानवी हक्काचे अनन्यसाधारण महत्त्व आहे

२. भारतीय संविधानामधून स्त्रियांना मानवी हक्काची प्राप्ती झाली आहे

## संशोधन पध्दती

प्रस्तुत पेपर वर्णनात्मक विश्लेषणात्मक आहे. त्यात वापरलेली तथ्ये दुयम स्त्रोताकडून संकलीत केली आहेत.

## प्रस्तावना

भारतीय राज्यघटनेच्या कलम 15 अन्वये धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास घटनेने मनाई केलेली आहे. याच धोरणामुळे स्त्री आणि पुरुष यांना समान अधिकार आणि हक्क मिळाले आहेत. महिलांच्या संरक्षणासाठी शासन कायदे, निर्णय, विविध परिपत्रके काढत असते परंतु त्याची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी न झाल्याने अद्यापही महिला त्यांच्या हक्क आणि अधिकारापासून वंचित आहेत.

भारतातील तसेच जगातील लोकसंख्येच्या 50 टक्के जनसंख्या ही महिलांची आहे त्यामुळे महिला आणि त्यांचा विकास हा कोणत्याही देशाच्या विकासात मोलाचे योगदान देऊ शकते महिलांना नुसते हक्क दिले म्हणजे आपली जबाबदारी संपली असे होत नाही. महिलांचे हक्क आणि त्यांची अंमलबजावणी जितकी गरजेची आहे. तितकेच त्यांना

सक्षम करणे ही अत्यंत महत्त्वाचे आहे महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सुरक्षितेसाठी शासन स्तरावर विविध प्रकारच्या कायद्यांचा प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत असते याविषयी समाजामध्ये जागृती करणे गरजेचे ठरते.

**स्त्री हक्क**

भारत देशातच नव्हे तर जगाच्या इतिहासात परकीय आक्रमणे जीत जेते, जेत्याशी सख्य संबंध राहण्यासाठी जीत लोक आपल्या कन्याही अर्पण करत होती. जोधपूरची कन्या हिंडीबा - भीम, अकबर, सुमित्रा दशरथ ही उदाहरणे आहेत काळाच्या ओघाने स्त्रीचे स्वातंत्र्य जाऊन तिला आपल्या स्वतंत्र्यासाठी, हक्कासाठी, जगण्यासाठी चळवळीचा मार्ग स्वीकारावा लागला आणि ती आपल्या हक्कासाठी झगडू लागली, राज्य संस्था, धर्म संस्था, शिक्षण संस्था, विवाह संस्था आणि कुटुंब स्थानी महिलांचे स्वातंत्र्य हिरावले तिला स्वतःच्या हक्कासाठी स्वातंत्र्यासाठी स्वतःला उभे राहावे लागले मानवी स्वातंत्र्यासाठी जगात अनेक अनेक राज्यक्रांती झाल्या जसे की फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकेतील राज्यक्रांती. इंग्लंडची राज्यक्रांती, रशियाची राज्यक्रांती इत्यादी क्रांती झाल्या त्यामध्ये फ्रेंच राज्यक्रांतीने इ. सन 1792 मध्ये ल्सस्टोनेक्राफ्ट व मेरी या महिलांनी स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन' हा ग्रंथ प्रसिद्ध केला व आठव्या शतकात स्त्रियांना आपल्या हक्काबद्दल जाणीव करून दिली महिलांच्या हक्काची जाणीव फ्रेंच राज्यक्रांतीपासूनच जाणीव झाली.

प्रथमच इ.स. 1848 साली अमेरिकेत स्त्रियांची परिषद भरवण्यात आली होती. अमेरिकेतील मानवी हक्काच्या जाहीरनाम्यासारख्या स्त्रियांच्या परिषदेचे स्त्री हक्क तयार केले गेले. आणि ह्या करारानुसार स्त्रियांना सामाजिक, कायदेशीर, धार्मिक असे समान हक्क असावेत अशी मागणी केली गेली. अठराव्या शतकाच्या मध्यापासून नव्या युगाचे वारे वाहण्यास सुरुवात झाली होती सामाजिक राजकीय आर्थिक अशा सर्व क्षेत्रातून नवे विचार नव्या संकल्पना आकारण्यात येऊ लागल्या. समाजातील अर्धे अंग म्हणून असलेल्या असहाय्य स्त्रियांनाही त्यांच्या हक्काची जाणीव झाली आणि त्या आपल्या हक्कासाठी चळवळी करू लागल्या. भारतातील व्यक्ती स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, लोकशाही या नव्या विचारांचे प्रवाह वाहण्यास सुरुवात झाली. दहा डिसेंबर 1948 रोजी संयुक्त राष्ट्राने मानवी हक्काचा सार्वत्रिक जाहीरनामा' घोषित केला, भारतीय संविधानात मूलभूत हक्काचे महत्व जाणून तिसऱ्या भागात सहा प्रकारच्या मूलभूत हक्कांचा समावेश केला गेला आहे. भारतीय राज्यघटनेच्या भाग तीन मध्ये कलम 12 ते 35 मध्ये मूलभूत हक्क' स्पष्ट करण्यात आले आहेत यालाच भारताची मॅँग्नाकार्टा असे संबोधले जाते. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना सहा मूलभूत हक्क दिलेले आहेत. १. समतेचा हक्क २. स्वातंत्र्याचा हक्क ३. घोषणाविरुद्धचा ४. धर्म स्वातंत्र्याचा हक्क ५. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क ६. घटनात्मक उपाय योजनेचा हक्क.

१. अनुच्छेद 14 - कायद्याने समानता व समान संरक्षण

२. अनुच्छेद 15 - केवळ धर्म, वंश, जात, लिंग यावरून सार्वजनिक स्थानेव जागा यांचा वापर करण्यास कुठल्याही भारतीय नागरिकाला भेदभाव करता येणार नाही.

३. अनुच्छेद 15 (३) - राज्य शासन महिला व बालकांसाठी विशेष तरतूद.

४. अनुच्छेद 16 - सेवा योजना, पद नियुक्ती, नोकरी यामध्ये धर्म व जात, लिंग यावरून भेदभाव न करता महिला व मुलींना समान संधी.

५. अनुच्छेद 17 - महिला व पुरुष यांच्यातील अस्पृश्यता नष्ट करणे.

६. अनुच्छेद 19 - भाषण स्वातंत्र्य आणि व्यक्ती स्वातंत्र्य शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य, मुक्तपणे संचारास स्वातंत्र्य.

७. अनुच्छेद 21 - कायद्याच्या प्रक्रिये शिवाय व्यक्तीच्या जीवित व स्वातंत्र्याचा हक्काचा संकोच करता येणार नाही.

८. अनुच्छेद 21 (क) - 6 ते 14 वर्षातील मुलांना शिक्षणाचा अधिकार.

९. अनुच्छेद 23 - शोषणाविरुद्ध अधिकार, मानवाचा व्यापार, अथवा वेठबिगारीस प्रतिबंध.

१०. अनुच्छेद 25 - सद्सद्विवेक बुद्धीच्या स्वातंत्र आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रचार.

११. अनुच्छेद 26 - धर्मविषयक स्वातंत्र्य

१२. अनुच्छेद 39 - स्त्री पुरुष दोघांना समान वेतन

१३. अनुच्छेद 42 - कामाच्या ठिकाणी न्याय व सुरक्षितता आणि प्रसुती सहाय्य देण्याची सोय

१४. अनुच्छेद 51 - स्त्रियांच्या प्रतिमेला हानी पोहचविणाऱ्या प्रथा बंद करणे इ.

वरील प्रमाणे घटनेने महिलांच्या संरक्षणासाठी विविध कलमे अधोरेखित केली आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या कलम 15 अन्वये धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई केली आहे. याच धोरणामुळे पुरुष आणि स्त्रीयांना समान अधिकार आणि हक्क घटनेने प्राप्त करून दिले आहेत. महिलांच्या संरक्षणासाठी शासनाने कायदे, निर्णय विविध परिपत्रके काढले असून सुद्धा त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे अद्यापही महिला त्यांच्या हक्क आणि अधिकारांपासून वंचित आहेत. "प्रत्येक मानवाला चांगले आणि उत्कृष्ट जीवन जगण्यासाठी आणि स्वतःच्या भौतिक व नैतिक असा विकास घडवून आणण्यासाठी काही गोष्टी अत्यावश्यक असतात ते म्हणजे हक्क असतात ते मूलभूत हक्क म्हणून ओळखले जातात." कोणत्याही लोकशाही देशाच्या राज्यघटनेत मूलभूत हक्कांचा समावेश केलेला दिसून येतो आणि त्यांच्या संरक्षणासाठी जबाबदारीची योग्य ती तरतूद केलेली असते.

**हक्काचे दोन प्रकार आहेत**

१. नागरी हक्क २. राजकीय हक्क

यातील नागरी हक्कामध्ये जीविताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शैक्षणिक हक्क, मालमत्तेचा हक्क आणि धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क हे प्रमुख हक्क आहेत.

**१. जीविताचा हक्क**

प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा हक्क आहे शारीरिक हल्ला झाल्यास त्यापासून स्वतःचे संरक्षण करण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला असतो.

**२. स्वातंत्र्याचा हक्क**

भाषण आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, संचार, व्यवसाय स्वातंत्र्य अशा प्रकारे विविध स्वातंत्र्याचे हक्क घटना मिळवून देते.

**३. मालमत्तेचा हक्क**

मानवाला स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबाच्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी सुरक्षित चांगले सुखयोगी जीवन जगण्यासाठी मालमत्ता प्राप्त करणे, तिचा संचय करणे आणि त्याचा स्वतःचा इच्छेनुसार त्याचा वापर करण्याचा हक्क हा मालमत्तेचा हक्क त्यामध्ये येतो.

**४. शैक्षणिक हक्क**

व्यक्तीमधील सुप्त गुणांचा विकास होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाची गरज असते आणि तो मिळवण्याचा हक्क सर्वांना आहे सर्व मुलांना चौदा वर्षापर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण घेण्याचा हक्क देण्यात येते.

**५. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क**

प्रत्येक व्यक्तीला आपल्या तिचे प्रमाणे कोणत्याही धर्माचे आचरण व अनुसरण करण्याचा, प्रसार करण्याचा अधिकार आहे. तसेच धार्मिक आणि धर्मदाय संस्थांची स्थापना करण्याचा कारभार पाहण्याचा हक्क अधिकार दिला आहे.

**६. राजकीय हक्क**

राजकीय हक्कांमध्ये मतदानाचा हक्क. निवडणूक लढविण्याचा हक्क, शासकीय अधिकार पद प्राप्त करण्याचा अधिकार, सरकारी धोरणावर टीका करण्याचा हक्क, शासकीय धोरणांचा विरोध करण्याचा अशा विविध प्रकारचे हक्कांचा समावेश होतो.

**१. मतदान करण्याचा हक्क** मतदानाचा हक्क मर्यादित असणे लोकशाही तत्त्वाला बाधक मानले जाते त्यामुळे लोकशाही देशात सार्वत्रिक प्रौढ मताधिकार देण्यात आला. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार याचा अर्थ सर्व प्रौढ स्त्री-पुरुष नागरिकांना अठरा वर्षावरील स्त्री पुरुषांना मतदानाचा अधिकार असतो.

**२**.**निवडणूक लढवण्याचा हक्क** समाजातील कोणताही व्यक्ती निवडणूक लढवू शकतो. यामध्ये धर्म, वंश, जात, पंथ अशा कोणत्याही कारणावरून भेदभाव केला जाणार नाही याची तरतूद घटनेने केलेली आहे.

## निष्कर्ष

"जगातील लोकशाही असणाऱ्या अशा प्रत्येक देशामध्ये व्यक्तीला स्वतःचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी अत्यावश्यक अशी सामाजिक परिस्थिती निर्माण करणाऱ्या घटकांना हक्क असे म्हणतात." देशातील प्रत्येक व्यक्तीला त्यांचा धर्म, वंश, जात, पंथ, लिंग यावरून भेदभाव न करता त्या व्यक्तीला घटनेने दिलेले हक्क प्रदान करणे व त्या हक्कांच्या संरक्षणासाठी तरतूद करणे ही राज्याची जबाबदारी असते आणि ती समाजातील स्त्री-पुरुषांना वेगवेगळी हक्क न देता बरोबरीनेच घटनेने हक्काची तरतूद केलेली आढळून येते.

## संदर्भसूची


१. आदिवासी महिलांचे पंचायतराज संस्थेतील योगदान, डॉ. संजीव पगारे, जानेवारी 2022, इंफोटेक प्रा. लि. प्रकाशन.
२. पाटील व्ही.वी., भारताची राज्यघटना, के. सागर पब्लिकेशन, द्वितीयावृत्ती.
३. महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, 14/06/2020.
४. व्यक्ती, समाज आणि राज्यसंस्था, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन – 2002, प्रकाशक – डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, यचममुवि.
५. महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन, महिला धोरण – 2014